# मत्स्य महाविद्यालय

(डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली)
शिरगांव, रत्नागिरी – ४१५६२९ (महाराष्ट्र)
[टेलि. (02352) 232241, ई–मेल: adfishe.bskkv@gov.in/cofrtn@yahoo.com ]

जा.क्र. ममवि/ग्रंथालय/का.स./ 592/२०२५, दिनांक :- 7 APR 2025

-: जाहिर सूचना पत्र :-

मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी अंतर्गत ग्रंथालय विभागातील ग्रंथालयसंबंधी कामे करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने कार्यालय सहाय्यकाची नेमणूक करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. कामाचा कालावधी, आवश्यक पात्रता वेतन इ. बाबत माहिती पुढीलप्रमाणे -

| विभागाचे नाव व कामाचे ठिकाण | पदाचे नाव | आवश्यक कंत्राटी कार्यालय सहाय्यकाची संख्या | कामाचा कालावधी | ग्रंथालयीन कार्यालय सहाय्यकासाठीची आवश्यक पात्रता | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|---|
| ग्रंथालय विभाग, मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी | कार्यालय सहाय्यक | १ | ११ महिने | ग्रंथालय शास्त्रातील पदवी व संगणक हाताळण्याचे ज्ञान तसेच ग्रंथालय संगणक आज्ञावलीचे ज्ञान, वियालयात तसेच महाविद्यालयातील ग्रंथालयात प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव प्राप्त उमेद्वारास प्राधान्य देण्यात येईल इ. | रू. १५०००/- |

नियम/अटी व शर्ती :-

१. इच्छुक उमेदवारांनी विहीत अर्जाच्या नमुन्यामध्ये पुर्ण तपशिल भरून अर्ज आवश्यक कागदपत्रांसहित सादर करावा. सदर अर्ज दिनांक ३०/०४/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेपर्यन्त मा. सहयोगी अधिष्ठाता, मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी - ४१५६२९ यांचे नावे टपालाने, हातवटडयाने अथवा कुरीअर व्दारे पाठविण्यात यावा.
२. लखोटयावर ग्रंथालय कार्यालय सहाय्यक पदासाठी अर्ज असे नमुद असणे आवश्यक आहे.
३. अर्जासोवत शैक्षणिक अर्हता, आधार/पॅन कार्डची छायांकित प्रत व इतर आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत प्रती सादर करणे आवश्यक आहे. अर्जावर स्वत:चा अलिकडचा फोटो चिकटविण्यात यावा.
४. उमेदवाराच्या प्राप्त अर्जाची छाननी करण्यात येईल व पात्र आणि अपात्र अर्जधारकांची यादी वियापीठ संकेतस्थळावर http://dbskkv.org वर प्रसिध्द करण्यात येईल.
५. मुलाखतीच्या दिवशी नमुद सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील
६. मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या उमेदवरांना कोणताही प्रवास भत्ता देय राहणार नाही.
७. नेमणुक झाल्यास नेमणूकीच्या आदेशातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्यावावतचा करारनामा रू. ५००/- च्या बंधपत्रावर स्वाक्षांकित करून उमेदवाराने हजर होतेवेळी कार्यालयात सादर करावा, त्यानंतर सदर नेमणूक कार्यान्वित होईल.
८. उमेदवारला प्रकल्प/योजनेतील नेमणूक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठांतर्गत संस्थेमध्ये नियीमत आस्थापनेवर नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.
९. उमेदवाराला नोकरी सोडून जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाऊ सूचना यावी लागेल अन्यथा एक महिन्याचे वेतन वसूल करण्यात येईल.

१०. तात्पुरत्या नेमणुकीनंतर निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने राजीनामा दिल्यास प्रतिक्षा सूचीतील उमेदवाराची उर्वरीत कालावधीसाठी नियुक्ती करण्यात येईल.

११. तात्पुरत्या नेमणुकीच्या कालावधीत सर्व शासकीय सुट्ट्या आणि दोन महिन्यांसाठी एक यानुसार किरकोळ रजा देय राहतील. या व्यतिरिक्त रजा या विनपगारी करण्यात येतील.

१२. मुलाखतीच्यावेळी उमेदवाराची वयोमर्यादा कमीत कमी २१ वर्षे व जास्तीत जास्त ३८ वर्षे असावी, (SC/ST/NT/DT/OBC/SBC etc.) इत्यादि शासन नियमानुसार शिथिलता असेल.

१३. कार्यालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ९.०० ते १३.३० व दुपारी १४.०० ते सायंकाळी ५.३० अशी राहील, तथापि दिवसाचे काम वाढल्यास कार्म पुर्ण होईपर्यन्त थांबावे लागेल तसेच सुट्टीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार कार्यालयात उपस्थित रहावे लागेल.

१४. सुट्टीच्या दिवशी काम केल्याचे अतिरिक्त वेतन आदा होणार नाही परंतु सदर दिवसाची बदली सुट्टी अनुज्ञेय ठरेल.

१५. काम समाधानकारक न वाटल्यास त्याच्या सेवा कोणत्याही दिवशी समाप्त करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील.

१६. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्र. एकएलपी-५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरील उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क सांगता येणार नाही.

१७. कोणत्याही टपाल विलंबास संबंधीत कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१८. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना-अ मध्ये अर्जासोबत सादर करावे. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना-अ चे पत्र जाहिराती सोबत जोडण्यात आले आहे.

१९. नावामध्ये बदल असल्यास गॅझेट (राजपत्र) अर्जासोबत सादर करण्यात यावे.

२०. निवढ झाल्यावर कार्यालयाने आदेश दिल्यानुसार कार्यालयात कामावर उपस्थित राहणे बंधनकारक राहील

सोबत :- विहित अर्जाचा नमुना

सहयोगी अधिष्ठाता,
मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी

प्रत माहितीसाठी व प्रसिध्दीसाठी....

१. प्रभारी अधिकारी, कृषी ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बा. सा. को. कृ. वि., दापोली.
 २/- त्यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात व अर्जाचा नमुना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर त्वरित प्रसिध्द करण्यात यावा.

२. डॉ. बा. सा. को. कृ. वि., दापोली अंतर्गत सर्व महाविद्यालये/सर्व विभाग प्रमुख/सर्व संशोधन केंद्र.

३. मत्स्य महाविद्यालयाचा सुचना फलक.